नि.फौ.ख.क्र.९८/२०२३
शासन विरुध्द सचिन यादव
नि.क्र. २४

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४**
मी देवाची शपथ खरे सांगतो की,
माझे नाव – किसन एकनाथ यादव,
वय – ५६ वर्षे, कामधंदा - शेती,
राहणार - गुळुंब, ता.वाई, जि. सातारा.

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती जाधव -**

मी फिर्यादी मंगल यादव व त्यांची सुन रूपाली हिस ओळखतो. ते माझे शेजारी आहेत. त्यांचे शेत माझया शेतालगत आहे. त्या शेतात त्यांचा गुराचा गोठा आहे. तसेच मी आरोपी सचिन यास देखील ओळखतो कारण तो देखील माझा शेजारी आहे. तो गावात राहायला आहे. घटना जानेवारी २०२३ मध्ये संध्याकाळी ०७.०० वाजता मंगल यादव यांच्या शेतातील गोठयासमोर घडली. त्यावेळी मी माझया शेतातील घरासमोर माझया पत्नीसह बसलो होतो. तेव्हा आरोपी हा फिर्यादीस शिवीगाळ करीत होता. त्यामुळे फिर्यादी देखील आरोपीस शिवीगाळ करीत होती. मी त्यांच्याजवळ गेलो व आरोपीस म्हणालो की बाई माणसाला शिव्या देवु नको कारण त्यांच्या घरातील कुणीही पुरूष व्यक्ती तेथे नाही. त्यामुळे आरोपी हा त्याच्या घरी निघुन गेला. त्याचे घर तेथुन ५०० मीटर अंतरावर होते. त्यानंतर मी माझया घरात परतलो.

२. काही वेळानंतर पाच मिनिटातच मला आरडाओरड करण्याचा आवाज झाला. माझया पत्नीने मला सांगितले की परत भांडणे झाली आहेत तुम्ही जावा. त्यामुळे मी तेथे गेलो तेव्हा मी पाहिले की फिर्यादी आरोपीच्या घरासमोर उभी होती. त्या छाती धरून होत्या. त्यांचे असे म्हणणे होते की त्यांना आरोपीने पिंपर्णीच्या लाकडाने मारहाण केली आहे. त्यावेळी आरोपीच्या हातात पिंपर्णीच्या काठी सदृश्य लाकुड होते, परंतु मी आरोपीने फिर्यादीस मारहाण करताना पाहिले नाही. मी आरोपीस म्हणालो की मारहाण करू नको व ती काठी टाकुन दे. त्यानंतर मी फिर्यादीस देखील तीच्या घरी जाण्यास सांगितले. मी सुध्दा माझया घरी परतलो. आरोपी आज न्यायालयात हजर आहे. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता.

**सदर साक्षीदार सरकारपक्षाच्या कथनास समर्थन करीत नसल्याने त्यास सहायक सरकारी अभियोक्ता हयांनी उलटतपसाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी देण्यात आली.**

३. हे म्हणणे खरे नाही की मी ज्यावेळी घटनास्थळी म्हणजेच फिर्यादीच्या गुरांच्या शेडसमोर गेलो त्यावेळी आरोपी फिर्यादीस मारहाण करताना प्रत्यक्ष पाहिले होते. आता मला माझया जबाबातील अधोरेखांकीत भाग अ वाचुन दाखविण्यता आला. तो बरोबर नाही. पोलीसांनी तसे माझया जबाबात का नमुद केले याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपी माझा शेजारी आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मी घटना प्रत्यक्ष पाहिली नसल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादीने आरोपीस शिवीगाळ केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. डी.पी.धुमाळ** -

४. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादी व आरोपी यांच्यात शेतातील पिकांना पाणी देण्याच्या कारणावरून वाद आहेत. हे म्हणणे खरे आहे की त्या पाण्याच्या वादावरून फिर्यादीने आरोपी विरूध्द पोलीस तक्रार केली आहे. तीने पोलीसांकडे दिलेल्या तक्रारीबाबत मला वैयक्तीक कोणतीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी व आरोपी यांच्यात शिवीगाळ झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे पत्नीकडे पोलीसांनी कोणतीही चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की आरोपीच्या हातात पिंपर्णीचे लाकुड पाहिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

***उलटतपास पुर्ण. फेरतपास काहीही नाही.***

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,
*स्वाक्षरी/-*

दि.१३.१२.२०२४

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.१,वाई.